<table>
<tr><td rowspan="5">MHGA110000782024</td><td>दाखल तारीख</td><td>:</td><td>०६.११.२०२४</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td>:</td><td>०६.११.२०२४</td></tr>
<tr><td>निकाल तारीख</td><td>:</td><td>०८.०७.२०२६</td></tr>
<tr><td>कालावधी</td><td>:</td><td>०१ वर्षे, ०८ महिना, ०२ दिवस</td></tr>
<tr><td colspan="3">निशाणी क्रमांक ११ सलग</td></tr>
</table>

**भाग ''अ''**

**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i)}**

<table>
<tr><td></td><td colspan="2">कोरची येथील ग्राम–न्यायालयात, जिल्हा–गडचिरोली<br>पिठासीन अधिकारी : एन.पी. देशपांडे<br>न्यायाधिकारी, ग्राम–न्यायालय,</td></tr>
<tr><td rowspan="2">CNR No. MHGA110000782024</td><td colspan="2">न्यायनिर्णय दिनांक ०८ जुलै, २०२६ रोजी</td></tr>
<tr><td colspan="2">संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ६६/२०२४</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">अपराध क्रमांक १५/२०२४, भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३८, ४२७ आणि मोटार वाहन कायदयाचे कलम १८४, ३/१८१ पोलीस स्टेशन कोरची, तालुका–कोरची, जिल्हा–गडचिरोली.</td></tr>
<tr><td>अभियोग पक्ष</td><td></td><td>महाराष्ट्र शासनतर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे कोरची,<br>तालुका–कोरची, जिल्हा–गडचिरोली.</td></tr>
<tr><td>अभियोग पक्षातर्फे</td><td colspan="2">विद्वान सहाय्यक सरकारी वकील श्री. ए.पी. नाकाडे</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td></td><td>अजय राकेश देवांगण,<br>वय: २५ वर्षे, धंदा – मजुरी,<br>राहणार – पारागांव, तालुका–बालोद,<br>जिल्हा–बालोद(छत्तीसगड).</td></tr>
<tr><td>आरोपीतर्फे</td><td></td><td>विद्वान विधीज्ञ श्री. जी.एम. नागमोती.</td></tr>
</table>

## भाग ''ब''

## (फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | १९.०२.२०२४ |
| पहिली खबरीची तारीख | १९.०२.२०२४ |
| दोषारोपत्राची/फिर्याद दाखल तारीख | ०६.११.२०२४ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | ०८.०१.२०२५ |
| जबाब नोंदणी सुरू झाल्याची तारीख | २४.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०८.०७.२०२६ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असल्यास | --- |

**आरोपीचा तपशील :**

| आरोपीचे स्थान | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील गुन्हे | निर्दोष मुक्त अथवा शिक्षा | लादलेली शिक्षा | खटल्याची प्रकिया सुरू असतांना आरोपी न्यायाधीनबंदी असल्याचा फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ प्रमाणे सुट मिळण्यासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | **अजय राकेश देवांगण** | --- | ०६.११.२४ | भा.दं.वि. चे कलम २७९, ३३८, ४२७ व मो.वा.का. चे कलम १८४, ३/१८१ | निर्दोष मुक्त. | निरंक. | लागु नाही. |

## भाग ''क''

## {फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii)}

## सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन साक्षदारांची यादी

**अ. सरकारपक्ष/फिर्यादीपक्ष :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
| स.सा.१ | जयंत वामन मोहुर्ले | फिर्यादी |
| स.सा.२ | भाऊराव तुळशीराम मोहुर्ले | साक्षीदार |

**ब.	बचाव, असल्यास :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**क.	बचाव न्यायालयीन साक्षदार, असल्यास :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ.	फिर्यादीपक्ष/सरकारपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**ब.	बचावपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**क.     न्यायालयीन निशाणी :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**ड.     महत्वाचे वस्तु :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

---

**दोषारोप : भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदयाचे कलम १८४, ३/१८१ नुसार शिक्षापात्र अपराधासाठी.**

---

## न्यायनिर्णय

(दिनांक ०८ जुलै, २०२६ रोजी घोषित)

नि.क्र.१६ व नि.क्र. २१ वरील तडजोड पत्राप्रमाणे फिर्यादी, मयत अथर्व मोहुर्ले चे वडील व आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३३८, ४२७ साठी तडजोड केली आहे, इतर गुन्हे तडजोड पात्र नसल्याने त्याची परवानगी नाकारण्यात आली. आरोपीविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम २७९ व मोटार वाहन कायदयाचे कलम १८४, ३/१८१ नुसार शिक्षापात्र अपराधासाठी संपरिक्षा चालविण्यात आली.

२.     खटल्यातील आलेल्या माहीतीवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १९.०२.२०२४ रोजीचे १९.०० ते १९.३० वाजताच्या सुमारास मौजा बेडगांव रोड चर्च जवळ कोरची, तालुका कोरची, जिल्हा गडचिरोली येथे ··· | नकारार्थी. |

आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन क्र. एम.एच.–३४–एटी–१७१२ हे मानवी जीवीत धोक्यात येईल, अगर अन्य व्यक्तीला दुखापत, अगर नुकसान पोहोचण्याचा संभव आहे इतक्या हयगयीने किंवा निष्काळजीपणाने चालविले व त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधानाचे कलम २७९ नुसार अपराध केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ?

२. वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील उपरोक्त वाहन हे रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करून इतरांची व्यक्तिगत सुरक्षतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे वेगात चालविले आणि त्याद्वारे मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ नुसार अपराध केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? ... नकारार्थी.

३. वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील उपरोक्त वाहन विना परवाना रस्त्यावर चालविले आणि त्याद्वारे मोटार वाहन कायद्याचे कलम ३ दंडनीय कलम १८१ नुसार अपराध केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? ... नकारार्थी.

४. आदेश काय ? ... अंतिम आदेशाप्रमाणे.

## <u>कारणमिमांसा</u>

३. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ म्हणुन फिर्यादी जयंत वामन मोहुर्ले व साक्षीदार क्र. २ म्हणुन भाऊराव मोहुर्ले यांना नि.क्र. ११ वर तपासले आहे. नि.क्र. १ वरील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा

संपविला. नि.क्र. ०१ वरील आदेश दिनांक ०८.०७.२०२६ रोजी आरोपीची भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे जबानी नोंदविण्यात आली नाही. आरोपीचा बचाव त्याने गुन्हा केला नाही असा आहे. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

<u>मुद्दा क्र. १ ते ३ साठी</u>–

४. आरोपी वरील भारतीय दंड विधानाचे कलम २७९ व मोटार वाहन कायदयाचे कलम १८४, ३/१८१ चा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन क्र. एम.एच.–३४–एटी–१७१२ हे मानवी जीवीत धोक्यात येईल, अगर अन्य व्यक्तीला दुखापत, अगर नुकसान पोहोचण्याचा संभव आहे इतक्या बेदरकारपणाने किंवा हयगयीने चालविले, रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करून इतरांची व्यक्तिगत सुरक्षतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे वेगात चालविले, उपरोक्त वाहन चालविण्याचा परवाना नव्हता हे अभियोग पक्षास सिद्ध करणे आवश्यक आहेत.

५. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ म्हणुन फिर्यादी जयंत वामन मोहुर्ले याला नि.क्र. ११ वर तपासले आहे. फिर्यादीचे तोंडी पुराव्याप्रमाणे दिनांक १९.०२.२०२४ रोजी तो व त्याचे काकाचा मुलगा अथर्व मोहुर्ले सायंकाळी ०७.३० वाजताचे सुमारास चौकात नाश्ता करायला गेले होते, त्या दरम्यान अथर्व मोटारसायकल जवळ उभा असतांना एक गाडीने त्याला धडक दिली, तो व आरोपी रस्त्यावर खाली पडले व अथर्वच्या डोक्याला मार लागला. परंतु, सदरची घटना फिर्यादीने स्वत: पाहिली नाही व फिर्याद वरील त्याची सही मान्य केली असली तरी त्यातील मजकुर नाकारला आहे. विद्वान सरकारी वकीलांनी उलटतपासात ग्राहय असणारे प्रश्न विचारले, त्यामध्ये देखील फिर्यादीने आरोपी त्याच्या ताब्यातील वाहन एम एच ३४ एटी १७१२ ने निष्काळजीपणे मोटारसायकल क्र. एम एच ३३ पी ७३२४ ला धडक दिली, रस्त्याचे परीस्थीतीकडे दुर्लक्ष करून आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन विना परवाना चालविल्याचे नाकारले आहे.

६. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. २ म्हणुन भाऊराव तुळशीराम मोहुर्ले यांना नि.क्र. ११ वर तपासले आहे. त्यांचे तोंडी पुराव्याप्रमाणे मयत अथर्व हा त्याचा मुलगा होता, सदर अपघाताची घटना त्याने पाहिली नसल्याचे सांगितली आहे व त्याची व आरोपीची न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली असल्याचे सांगितले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी अपघातानंतर दिड वर्षाने त्याचा मुलगा अथर्व याचे घरी निधन झाल्याचे मान्य केले आहे.

७. फिर्यादी, साक्षीदार क्र. २ मयत अथर्व मोहुर्ले याचे वडील भाऊराव मोहुर्ले व आरोपीची तडजोड झाल्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीचा बेदरकारपणा किंवा निष्काळजीपणा सिध्द झाला नाही. त्याच बरोबर अभियोग पक्षाने आरोपीने वाहन बेदरकारपणे चालविले व त्याचेकडे वाहन चालविण्याचा परवाना नव्हता या बाबींसाठी कसलाही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. सबब, अभियोग पक्ष आरोपीविरूध्दचे भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ व ३/१८१ चा गुन्हा सिद्ध करू शकले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ ची उत्तरे नकारार्थी नोंदवितो.

८. <u>**मुददा क्र. ४**</u> : माझे मुददा क्र.०१ ते ०३ वरील उत्तराप्रमाणे आरोपीला दोषमुक्त करणे न्यायोचित राहिल. प्रस्तुतचे खटल्यातील जप्त हिरो फॅशन एक्स प्रो मोटारसायकल वाहन क्र. एम.एच.–३४–एटी–१७१२ ही आव्हान कालावधीनंतर त्याचे नोंदणीकृत मालकाचे ताब्यात देणे न्यायोचीत राहिल. करिता मी मुददा क्र.०४ चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **अजय राकेश देवांगण** याची भारतीय दंड विधानाचे कलम २७९ व मोटार वाहन कायद्याचे कलम १८४, ३/१८१ च्या गुन्हयातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये दोषमुक्त करण्यात येते.

२. नि.क्र.१६, २१ वरील तडजोडी आधारे आरोपी अजय राकेश देवांगण याला

भारतीय दंड विधानाचे कलम ३३८, ४२७ च्या गुन्हयातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५९(८) अन्वये दोषमुक्तता करण्यात येते.

३. प्रस्तुत खटल्यातील जप्त हिरो फॅशन एक्स प्रो मोटारसायकल वाहन क्र. एम.एच.–३४–एटी–१७१२ ही आव्हान कालावधीनंतर त्याचे नोंदणीकृत मालकाचे ताब्यात देण्यात यावी.

४. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

५. आरोपीने अपील दाखल झाल्यास मा. अपील न्यायालयासमोर हजर राहण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे रक्कम रूपये १०,०००/– चा दिलेला वैयक्तीक जाचमुचलका व जमानदाराचे बंधपत्र हे पुढील सहा महिण्याकरीता अंमलात राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.07.08 18:43:15 +0530

(एन.पी. देशपांडे)
न्यायाधिकारी
ग्राम–न्यायालय, कोरची.

दिनांक : ०८.०७.२०२६
स्थळ :– कोरची.